**ठळक बातम्या**

- विकासाबाबतच्या जागतिक निकषांचा आमूलाग्र पुनर्विचार करायला हवा, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं जी-२० नेत्यांच्या शिखर परिषदेत प्रतिपादन
- ताडोबा व्याघ्र प्रकल्प परिसरातल्या ८०० एकर जागेचं लवकरच पर्यावरणीय पुनरूज्जीवन होणार
- शालेय मुलामुलींसाठी राज्य परिवहन महामंडळ हेल्पलाईन सुरू करणार असल्याची परिवहन मंत्र्यांची माहिती
- धाराशिव जिल्ह्यात रस्ते अपघातात ४ जणांचा मृत्यू तर ५ जण गंभीर जखमी

**आणि**

- भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातला दुसरा कसोटीत पहिल्या दिवसअखेर दक्षिण आफ्रिकेच्या ६ बाद २४७ धावा

**<><><><><>**

विकासाबाबतच्या जागतिक निकषांचा आमूलाग्र पुनर्विचार करायला हवा, असं आग्रही प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दक्षिण आफ्रिकेतल्या जोहान्सबर्ग इथं जी-२० नेत्यांच्या शिखर परिषदेत आज केलं. जी-२०नं प्रदीर्घ काळापासून जागतिक अर्थव्यवस्था आणि विकासाला चालना दिली आहे, मात्र सध्याच्या आराखड्यात मोठी लोकसंख्या ही संसाधनांपासून वंचित राहत आहे, तसंच यात निसर्गाला ओरबाडून घेतलं जातं, यामुळे उभ्या राहणाऱ्या आव्हानांचा सामना आफ्रिकेनं केला आहे, याकडे मोदी यांनी लक्ष वेधलं. नवी दिल्लीत झालेल्या शिखर परिषदेत घेतलेल्या काही ऐतिहासिक निर्णयांमध्ये वाटचाल सुरू असल्याचा उल्लेख त्यांनी केला. संपूर्ण जगाच्या साथीनं प्रगतीवर करण्यासाठी

भारताच्या संस्कृतीत रुजलेला एकात्म मानवतावाद मार्गदर्शक ठरतो, असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. जी-२० अंतर्गत जागतिक पारंपरिक ज्ञान भांडाराची स्थापना, जी-२० आफ्रिका-कौशल्यवाढ उपक्रमाची सुरुवात, जी-२० जागतिक आरोग्य प्रतिसाद पथकाची निर्मिती, अंमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी अंमली पदार्थ आणि दहशतवाद यांचा सामना करण्यासाठीचा उपक्रम असे महत्त्वपूर्ण प्रस्ताव मोदी यांनी आपल्या भाषणातून मांडले.

जी-२० शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री मोदी यांनी आज ब्रिटनचे प्रधानमंत्री किएर स्टार्मर यांची भेट घेतली. तसंच संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांच्याशीही त्यांनी चर्चा केली.

**<><><><><>**

ताडोबा व्याघ्र प्रकल्प परिसरातल्या ८०० एकर जागेचं पर्यावरणीय पुनरूज्जीवन वन विभाग लवकरच करणार असून या प्रकल्पाला झिरोधा कंपनी आणि रेनमॅटर फाऊंडेशन आर्थक सहाय्य करणार आहेत. जंगल, गवताळ प्रदेश किंवा जलक्षेत्रात मानवी हस्तक्षेप कमीत कमी ठेवून तेथील नैसर्गिक भूभाग, वन्यजीव आणि जैवविविधतेचं पुनरूज्जीवर या प्रकल्पाद्वारे केलं जाणार आहे. यासाठी झिरोधा कंपनीकडून शंभर कोटींचा झिरोधा रिवाइल्डिंग निधी उभारण्यात आला आहे. विदर्भातील पर्यावरणाच्या संवर्धनासाठी रिवाइल्डिंगसारखे प्रकल्प उपयुक्त आहे. अशा कामांमध्ये झिरोधा सारख्या कार्पोरेट कंपन्या सहभागी होत असून हा पर्यावरणपूरक उपक्रम केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर देशातील कॉर्पोरेट क्षेत्रासाठीही एक आदर्श ठरणार आहे. राज्य सरकार आणि वन विभागासोबतचं हे सहकार्य फलदायी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शेतीचं आणि पर्यायानं शेतकऱ्यांचं भवितव्य बदलू शकतं, असं मत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री तसंच ॲग्रो व्हिजन कृषी प्रदर्शनाचे मुख्य प्रवर्तक नितीन गडकरी यांनी आज व्यक्त केलं. 'संत्रा: स्पेन, इस्रायल व्हाया विदर्भ' या पुस्तकाचं प्रकाशन आज गडकरी यांच्या हस्ते नागपूर इथं झालं, त्यावेळी बातमीदारांशी ते बोलत होते.

**<><><><><>**

शालेय मुलामुलींसाठी राज्य परिवहन महामंडळ लवकरच हेल्पलाईन सुरू करत आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. धाराशिव मध्यवर्ती बसस्थानकाला आज भेट दिल्यानंतर ते बोलत होते. शाळा आणि घर या दरम्यान बस प्रवासात काही अडचण आल्यास, बस वेळेवर न आल्यास, अचानक रद्द झाल्यास विद्यार्थ्यांना योग्य ती मदत मिळावी, या उद्देशाने ही हेल्पलाईन सुरु केली जाईल. तसंच ३१ विभागातील सर्व विभाग नियंत्रकांचे संपर्क क्रमांक संबंधित शाळा, महाविद्यालयांना देण्यात येतील, असंही सरनाईक यांनी सागितलं. बस उशिरा सुटणं, रद्द होणं अशा कारणांमुळे मुलांचं शालेय नुकसान झाल्यास आगार व्यवस्थापक आणि पर्यवेक्षकांना जबाबदार धरलं जाईल, असं सरनाईक यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

दिव्यांग व्यक्तींना मेट्रो रेल्वेचा प्रवास शंभर टक्के मोफत करावा अशा मागणीचं पत्र केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलं आहे. सध्या मुंबई मेट्रो रेल्वे सेवेत दिव्यांग प्रवाशांना २५ टक्क्याची सवलत दिली जात आहे. मात्र ही अपूरी असून दिव्यांग व्यक्तींवर आर्थिक तसंच दैनंदिन प्रवासाचा ताण वाढत आहे, त्यामुळं आठवले यांनी मुख्यमंत्र्यांना मागणीचं पत्र पाठवलं आहे.

<><><><><>

हज यात्रेशी निगडित सर्व प्रक्रिया डिजिटल करून मानवी हस्तक्षेप दूर करण्याच्या सूचना केंद्रीय अल्पसंख्यक सचिव चंद्र शेखर कुमार यांनी भारतीय हज समितीला दिल्या आहेत. मुंबईत झालेल्या हज परिषदेत ते बोलत होते. हज यात्रेसाठी अर्ज करण्यापासून यात्रेहून परत आल्यानंतर करायच्या प्रक्रिया सुद्धा डिजिटल करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

हज यात्रेकरूंच्या थकीत रकमेपैकी ७५ टक्के त्वरित आणि उर्वरित २५ टक्के रक्कम निर्धारित पडताळणी पूर्ण केल्यावर देण्याचे आदेश त्यांनी दिले.

हज यात्रेकरूंची यात्रा आधीच्या तुलनेत अधिक सुलभ, सोयीस्कर व्हावी यासाठी सर्व खबरदारी घेतली जाईल, असं आश्वासन हज समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शानवास सी. यांनी दिलं. देशाच्या विविध भागातून आलेल्या हज समितीच्या पदाधिकाऱ्यांनी यापूर्वी यात्रेत आलेल्या अडचणी मांडल्या. गेल्या आठवड्यात मृत्युमुखी पडलेल्या हज यात्रेकरूंना यावेळी आदरांजली वाहण्यात आली.

<><><><><>

**धाराशिव** जिल्ह्यातल्या अणदूर जवळ आज सकाळी एका वाहन अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला असून ५ जण गंभीर जखमी झाले. मृतांमध्ये ३ महिलांचा समावेश आहे. धावत्या क्रूझर गाडीचे टायर फुटल्याने चालकाचं नियंत्रण सुटलं आणि हा अपघात झाला. हे सर्व जण सोलापूर जवळच्या कासेगाव-उळे इथून निघाले होते.

<><><><><>

बीड जिल्ह्यात धारूर-केज मार्गावर धुनकवड फाटा परिसरात आज झालेल्या अपघातात भोगलवाडी इथले एकाच कुटुंबातले चार जण जखमी झाले. उपमुख्यमंत्री अजित पवार दुपारी धारूरवरून केजकडे जात असताना त्यांच्या ताफ्यातल्या वाहनाची आणि दुचाकीची धडक झाली. यात ताफ्यातील सुरक्षा रक्षकही जखमी झाला आहे. स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदत करत जखमींना रुग्णालयात नेलं. जखमींपैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. जखमींवर अंबाजोगाई इथल्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

राज्यातल्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी काल अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर निवडणुकीचं चित्र स्पष्ट झालं असून उमेदवार आणि पक्षांनी प्रचाराला जोमाने सुरुवात केली आहे.

आगामी स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीत शिवसेनेच्या उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून द्या, असं आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पालघरमध्ये झालेल्या सभेत केलं. शिंदे यांनी डहाणू, जव्हार, पालघर आणि वाडा इथं आज जाहीर सभा घेतल्या.

**काँग्रेस** पक्षाच्या नेत्यांमध्ये प्रचंड विसंगती असल्यानं हा पक्ष देशातून हद्दपार होत आहे. २०२९ पर्यंत या पक्षाचं अस्तित्व फार शिल्लक राहणार नाही, अशी टीका  महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. गडचिरोली इथं भाजपच्या नगर परिषद निवडणुकीच्या प्रचार कार्यालयाचं उद्घाटन झालं. त्यानंतर झालेल्या सभेत ते बोलत होते.

**लोकशाही** पायदळी तुडवून राज्यात बिनविरोध निवडणुका होत असल्याची टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. ते आज नागपूर इथं बातमीदारांशी बोलत होते. या पार्श्वभूमीवर निवडणुका पारदर्शक होतील का असा सवालही वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

**स्थानिक** स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्षाने  विरोधी पक्षातील उमेदवारांना त्यांचे अर्ज मागे घेण्यासाठी दमदाटी केली असा आरोप करत महायुतीला पराभूत करण्याचं आवाहन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केलं. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी सपकाळ यांनी आज बीड, परभणी आणि जालना जिल्ह्यात प्रचार सभा घेतल्या त्यानंतर ते बातमीदारांशी बोलत होते.

<><><><><>

महानगरपालिका निवडणुकांसाठी २० नोव्हेंबरला संबंधित महानगरपालिकेच्या ठिकाणी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. मतदारांना यासंदर्भात काही हरकती, सूचना, तक्रारी असल्यास येत्या २७ नोव्हेंबरपर्यंत त्या दाखल कराव्यात, असं आवाहन राज्य निवडणूक आयोगानं केलं आहे.

<><><><><>

धुळे जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर समाजमाध्यमांवर देखरेख ठेवण्याचं काम पोलीस करत आहेत. समाजमाध्यम मंचांवर, चुकीची माहिती, अफवा, द्वेषपूर्ण भाषण, बदनामीकारक मजकूर, धार्मिक किंवा जातीय भावना भडकावणाऱ्या पोस्ट, व्हिडिओ, मीम्स प्रसारित होऊन कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी काळजी घेण्यात येत आहे.

<><><><><>

मुंबईत धारावीतल्या सायन-माहिम लिंक रोडवर असलेल्या माहिम फाटकाजवळच्या नवरंग कापाऊंड इथं आज दुपारी मोठी आग लागली. या दुर्घटनेत कुणीही जखमी झालं नाही. आग लागली ते ठिकाणी पश्चिम रेल्वे रुळांपासून जवळ असल्यानं या मार्गावरील रेल्वे वाहतूक काही वेळासाठी विस्कळीत झाली होती.

<><><><><>

'मराठी साहित्य संमेलनांवर खर्च करण्यापेक्षा जगभरातल्या वेगवेगळ्या भाषांमधलं दर्जेदार, तसंच नोबेलप्राप्त साहित्य मराठीत अनुवादित करण्यासाठी सरकारनं अनुदान द्यावं, अशी अपेक्षा ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस यांनी व्यक्त केली. मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती

मंडळातर्फे आज रत्नागिरीत एकदिवसीय जिल्हा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून गवस बोलत होते.

आपल्या भाषेच्या गौरवासाठी होणारी संमेलनं सरकारच्या निधीतून नाही, तर लोकवर्गणीतून केली पाहिजेत. सरकारचा निधी जगभरातलं तंत्रज्ञान आपल्या भाषेत आणण्यासाठी खर्च व्हावा. तसंच सरकारनं मराठी शाळा सशक्त कराव्यात,' असं मत गवस यांनी व्यक्त केलं.

**<><><><><>**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातला दुसरा कसोटी क्रिकेट सामना आजपासून गुवाहाटी इथं सुरु झाला. हा मालिकेतला अखेरचा सामना आहे.

सामन्याच्या आज पहिल्या दिवस अखेर दक्षिण आफ्रिकेनं आपल्या पहिल्या डावात ६ बाद २४७ धावा केल्या आहेत. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. दक्षिण आफ्रिकेचे सलामीवीर मार्करम आणि रिकल्टन यांनी संघाला ८२ धावांची दमदार सलामी दिली. पण ते एकामागोमाग एक बाद झाले. त्यानंतर स्टब्स आणि कर्णधार टेम्बा बवुमा यांनी तिसऱ्या गड्यासाठी ८४ धावांची भागिदारी करत दक्षिण आफ्रिकेचा डाव सावरला. बवुमा ४२ तर स्टब्स ४९ धावा करून बाद झाला.

आजच्या खेळाच्या ८२ व्या षटकात सिराजनं झॉर्जी याला बाद केलं. हे षटक संपल्यावर अंधूक प्रकाशामुळं खेळ थांबवण्यात आला.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. इतरत्र हवामान कोरडं राहील, असं हवामान विभागाचा अंदाच आहे.